## दरपत्रक मागविण्याची तिसरी वेळ

16 APR 2018

जा.क्र. पोआअ/प्रबंधक शाखा/AC- वार्षिक दरकरार/ 3841 /२०१८ अमरावती शहर दिनांक - १६/०४/२०१८

**संदर्भ :-** १) या कार्यालयाचे पत्र क्र. पोआअ/प्रबंधक शाखा/AC-वार्षिक दरकरार/१११९/२०१८ दि. ३०/०१/२०१८
२) या कार्यालयाचे पत्र क्र. पोआअ/प्रबंधक शाखा/AC-वार्षिक दरकरार/१००/२०१८ दि. २६/०२/२०१८

**विषय :-** या आस्थापनेवरील १८ - AC चा सन २०१८ करीता साहीत्यासह वार्षिक दुरूस्ती दरकरार करावयाचा असल्याने दोन लिफाफा पध्दतीनुसार दरपत्रके सादर करणे बाबत.

-oooo-

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, वरील सदंर्भीय पत्रानुसार या कार्यालयाचे आस्थापनेवरील एकुण १८ AC चा साहीत्यासह सन २०१८ करीता वार्षिक दुरूस्ती व देखभाल करार करावयाचा असल्याने अधिकृत कंपनी विक्रेता/पुरवठादार/वितरक यांचेकडून दोन लिफाफा पध्दतीनुसार वरील संदर्भीय पत्रान्वये सिलबंद दरपत्रके मागविण्यात आली होती. तथापि एकाही वितरक व पुरवठादार यांची दरपत्रक प्राप्त न झाल्याने पुन्हा तिस-या वेळेस दरपत्रके मागविण्यात येत आहे.

तरी खालील वितरक व पुरवठादार तसेच त्याव्यतिरिक्त ईच्छूक असलेले अधिकृत विक्रेते/पुरवटादारांनी त्यांची दोन लिफाफा पध्दतीनुसार सिलबंध दरपत्रके या कार्यालयातील प्रबंधक शाखेत दिनांक २३/०४/२०१८ ला ११.०० वाजेपर्यंत पर्यंत (शासकीय सुटी वगळून) सादर करावीत. पहिला लिफाफा हा तांत्रिक लिफाफा म्हणून (विवरणपत्र-१) आणि दुसरा लिफाफा (विवरणपत्र-२) असे दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रके सादर करणे अनिवार्य आहे. तांत्रिक लिफाफ्यामध्ये खालील आवश्यक कागदपत्रे असणे अनिवार्य आहे.

१. पुरवटादारांचे फर्म नोंदणी प्रमाणपत्र
२. पॅन कार्डची छायांकीत प्रत
३. GST प्रमाणपत्राची छायांकीत प्रत
४. कंपनीचे अधिकृत डिलर असल्याचे प्रमाणपत्र
५. AC मध्ये टाकावयाचे सर्व स्पेअरपार्ट ची अधिकृत यादी व प्राईजलिस्ट
६. AC दुरूस्तीकरीता नेमण्यात येणा-या अधिकृत तज्ञांचे नांव व अनुभवबाबत कागदपत्रे

**तांत्रिक लिफाफा (विवरणपत्रा-१) मध्ये वर नमुद केलेले आवश्यक कागदपत्रे आढळून आल्यानंतरच दरपत्रकाचा दुसरा लिफाफा उघडण्यात येईल. याची कृपया निविदाधारकांनी नोंद घ्यावी**. प्राप्त झालेली दरपत्रके उघडण्याबाबतचा दिनांक व वेळ संबधीतांना दुरध्वनीद्वारे/ई-मेलद्वारे सूचीत करण्यात येईल. तसेच विवरणपत्र-२ मध्ये AC चे वार्षिक दुरूस्ती व देखभाल बाबत वार्षिक दरकराचे प्रतीमहा दराचे दरपत्रक व त्यासोबत अधिकृत कंपनीची स्पेअरपार्ट ची यादी व प्राईज लिस्ट इत्यादी कागदपत्रे असणे अनिवार्य आहे, सदरचे पत्र हे या कार्यालयाचे cp.amravari@mahapolice.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा अपलोड करण्यात आलेले आहेत. तरी खालील व ईच्छूक निर्विदाधारकांनी सुध्दा दोन लिफाफा पध्दतीनुसार दरपत्रके या कार्यालयास विहीत मुदतीत सादर करावीत हि विनंती.

( एम.एच. बैस )
कार्यालय अधिक्षक
पोलीस आयुक्त,अमरावती करीता.

**प्रति,**

१) मे. ब्ल्यु. स्टार, सायन्सक्युब मार्केटींग प्रयव्हेट लिमीटेड, अमरावती.
२) मे. अर्पण रेफरीजीरेटर, अमरावती.
३) मे. हर्षद रेफरीजीरेटर अॅन्ड ईलेक्टीकल्स, अमरावती.

**प्रत,** **सपोनि** , सायबर सेल,

२/- उपरोक्त पत्र हे या कार्यालयाचे www.amravaticitypolice.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करून अपलोड केल्याबाबतची प्रत कृपया प्रबंधक शाखेत परत करावी.



Scanned by CamScanner